**नि.फौ.के. नं. ११५/२०२५**
**महाराष्ट्र शासन वि. शंकर**
**निशाण क्र. २६**

**(प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर आरोपीस रत्नागिरी मध्यवर्ती कारागृह यांचेकडुन व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर करण्यात आले. सदर व्हीडीओ कॉलची आवाज प्रेक्षपणाचा दर्जा तपासुन पाहण्यात आला असुन तो चांगला आहे. सदर आरोपी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर असताना त्याचेसमक्ष साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे.**

**सबब, सदर साक्षीदाराची साक्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहे.)**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – विजय तानाजी आंबेकर,

**वय** – ४५ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (पो.हे.कॉ.९०९),

**राहणार** – स्थानिक गुन्हे अन्वेषन शाखा, रत्नागिरी, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१.** दिनांक ११/११/२०२५ रोजी मी स्थानिक गुन्हे अन्वेषन शाखा, रत्नागिरी, जि. रत्नागिरी येथे कार्यरत होतो. संगमेश्वर पोलीस ठाणे येथील गुन्हा नोंदणी क्र. ११७/२०२५, भारतीय न्याय संहितेचे कलम ३३१(४) व ३०५(अ) अन्वये दाखल गुन्हयाचा समांतर तपास स्थानिक गुन्हे अन्वेषन शाखा, रत्नागिरी, जि. रत्नागिरी यांच्याकडुन सुरु होता. घटनास्थळावरील सी.सी.टी. फुटेजच्या आधारे सदरचा गुन्हा आरोपी – शंकर पाटील यांना केला असल्याचे आम्हाला गोपनीय माहिती मिळाली

होती.

०२. सदर गुन्हयामध्ये मोबाईल शॉपी फोडुन मोबाईल हँडसेट चोरीला गेले होते. त्यातील विवो कंपनीचा वाय – ५ जी चा मोबाईल व त्यातील सिमकार्ड हा प्रेम डुकरे, राहणार – शहापुर, मुरबाड रोड हा वापरत असल्याचे व सदरचे मोबाईलचे लोकेशन शहापुर, मुरबाड या ठिकाणी असल्याचे दिसुन आले. त्या अनुषंगाने मी, पो.हे.कॉ. श्री. विवेक रसाळ, दिपराज पाटील, चालक अतुल कांबळे असे आम्ही शासकीय वाहन क्र. एमएच–०८–बीई–०१७३ मधुन दिनांक ११/११/२०२५ रोजी रत्नागिरी येथुन निघुन शहापुर, जि. ठाणे येथे आलो. सदरचे ठिकाण हे किन्हवली पोलीस ठाणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रास असल्याने पोलीस तपास करणेकामी मदत मिळण्यासाठी पत्र दिले. *(साक्षीदारास दिनांक ११/११/२०२५ रोजीचे पत्र दाखविण्यात आले). ते तेच असुन त्यावर माझी व ठाणे अंमललदार – किन्हवली पोलीस ठाणे यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला **निशाणी क्रमांक २७** देण्यात येते).*

०३. त्यानुसार सदरचे ठाणे अंमलदार यांनी ठाणे दैनंदिनीला नोंद घेवुन त्याची प्रत मला दिली. *(साक्षीदारास किन्हवली ठाणे दैनंदिनी क्रमांक ०२९, दिनांक ११/११/२०२५ रोजीचा ठाणे दैनंदिनीचा उतारा दाखविला). तो तोच असुन त्यावर संबंधीत ठाणे अंमललदार – किन्हवली पोलीस ठाणे यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला **निशाणी क्रमांक २८** देण्यात येते).*

०४. मिळाल्या माहितीच्या व मोबाईल लोकेशनच्या आधारे आम्ही शुन्द्रुण बुद्रुक, ता. शहापुर, जि. ठाणे येथे आलो असता, २२:०० वाजण्याच्या सुमारास आम्हाला आरोपी – शंकर पाटील मिळुन आला. त्याला आम्ही त्यांचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव – शंकर अर्जुन पाटील उर्फ शंकर अर्जुन साळुंखे, राहणार –

कर्जत, जि. ठाणे असे सांगितले.

**०५**. आम्ही त्याच्याकडील मोबाईलची तपासणी केली असता, संगमेश्वर पोलीस ठाणे, गुन्हा क्रमांक ११७/२०२५ मधील चोरीला गेलेल्या मोबाईलशी त्याचे वर्णन व आयईएम क्रमांक मिळतेजुळते असल्याचे दिसुन आले. त्यानंतर, दोन पंचांना बोलावुन घेतले व त्यांच्यासमक्ष सदरचा मोबाईल जप्त करुन तसा पंचनामा २२:१० ते २२:४५ च्या दरम्यान पुर्ण केला. *(साक्षीदाराला वस्तु – ड कडील मोबाईल दाखविण्यात आला). तो तोच आहे. त्यावर असलेल्या लेबलवर माझी स्वाक्षरी आहे. (साक्षीदारास मोबाईल जप्तीचा पंचनामा दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी, दोन पंचांची व आरोपीची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.*

*(सदर दस्ताला निशाणी क्रमांक देण्यास बचावपक्षातर्फे आक्षेप घेण्यात आला की, पंच तपासण्यात आले नसल्याने पंचांच्या स्वाक्षरींना निशाणी क्रमांक देता येता येणार नाही.*

*सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदाराने पंचनामा केला असुन त्याबाबतचे कथन साक्षीत मांडले असुन पुर्ण पंचनाम्यास निशाणी क्रमांक देता येईल, असा युक्तीवाद सादर केला. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद व साक्षीदाराच्या साक्षीतील कथन पाहिले असता, बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेला आक्षेप संयुक्तिक वाटत नाही. सदर साक्षीदाराने पंचनाम्यातील मजकुराविषयी व स्वाक्षरीविषयी कथन केले असल्याने त्यास निशाणी क्रमांक देण्यात येत आहे. सबब, आक्षेप नामंजुर).*

**०६**. *(सदर दस्ताला **निशाणी क्रमांक २९** देण्यात येते).*

**०७**. सदर पंचनाम्यावेळी पो.हे.कॉ. श्री. विवेक रसाळ यांनी ई–साक्षमध्ये व्हीडीओग्राफी व फोटोग्राफी केली आहे. त्यानंतर, आरोपी व जप्त मुद्देमाल घेवुन

किन्हवली पोलीस ठाण्यात आलो. सदर आरोपीने उर्वरीत मुद्देमालाबाबत कोणतीही उत्तरे दिली नसल्याने त्याला संगमेश्वर पोलीस ठाणे येथे अधिक चौकशी कामी घेवुन येत असताना किन्हवली पोलीस ठाणे येथे ठाणे दैनंदिनीस नोंद करण्यात आली होती. *(साक्षीदारास किन्हवली ठाणे दैनंदिनी क्रमांक ०३०, दिनांक ११/११/२०२५ रोजीचा ठाणे दैनंदिनीचा उताऱ्याची छायांकित प्रत दाखविली). तो तोच ठाणे दैनंदिनीचा उतारा असुन त्यावर संबंधीत ठाणे अंमलदार – किन्हवली पोलीस ठाणे यांची स्वाक्षरी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (छायांकित प्रत असल्याने सदर दस्ताला* ***केवळ ओळखीकरीता निशाणी क्रमांक ३०*** *देण्यात येते).*

**०८.** त्यानंतर, आरोपी व जप्त मुद्देमाल घेवुन आम्ही शहापुर ते संगमेश्वर असा प्रवास करुन आरोपीची वैद्यकीय तपासणी करुन त्याला दिनांक १२/११/२०२५ रोजी संगमेश्वर पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले. वैद्यकीय तपासणी करण्यासाठी संगमेश्वर ग्रामीण रुग्णालय, यांनी मी दिनांक १२/११/२०२५ रोजी पत्र दिले होते. सदर पत्राची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल आहे. *(साक्षीदारास दिनांक १२/११/२०२५ रोजीचे पत्राची छायांकित प्रत दाखविण्यात आली). ती तीच असुन त्यावर माझी स्वाक्षरी असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. (छायांकित प्रत असल्याने सदर दस्ताला* ***केवळ ओळखीकरीता निशाणी क्रमांक ३१*** *देण्यात येते).*

**०९.** त्यानंतर, पोलीस निरीक्षक, संगमेश्वर पोलीस ठाणे यांना पत्र देवुन आरोपीला हजर करणेबाबत व सोबत जप्त मुद्देमाल व पंचनामा हजर करीत असलेबाबत पत्र देण्यात आले होते. *(साक्षीदारास दिनांक १२/११/२०२५ रोजीचे पत्र दाखविण्यात आले). ते तेच असुन त्यावर माझी व ठाणे अंमललदार – संगमेश्वर पोलीस ठाणे यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला* ***निशाणी क्रमांक ३२*** *देण्यात येते).*

**१०**. सदर पत्राच्याअनुषंगाने ठाणे अंमलदार – श्रीमती तांबडे यांनी सदरचा मुद्देमाल ताब्यात घेवुन त्याबाबतची मुद्देमाल पावती तयार करण्यात आली. *(साक्षीदारास दिनांक १२/११/२०२५ रोजीची मुद्देमाल पावती दाखविण्यात आली). ती तीच असुन त्यावर मुद्देमाल जमा करणार श्रीमती तांबडे यांची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला **ओळखीकरीता निशाणी क्रमांक ३३** देण्यात येते).*

**११**. आरोपीला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी व्ही.सी.वरुन दिसत असलेला आरोपी हा तोच आहे.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. एस. जोशी यांच्याकडून** –

**१२**. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शोधण्यासाठी आम्ही शुन्द्रुण बुद्रुक, ता. शहापुर, येथे गेल्याचे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक ३२ कडे पत्रात मोबाईल जमा करीत असलेबाबतचा स्पष्ट उल्लेख नाही. साक्षीदार पुढे सांगतो रुपये १८,९९९/– चा मुद्देमाल असे त्यात नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक २९ कडे मोबाईल जप्तीच्या पंचनाम्यावर पो.हे.कॉ.श्री. विवेक रसाळ यांची सही नाही.

**१३**. हे म्हणणे खरे आहे की, सदर निशाणी क्रमांक २९ कडे मोबाईल जप्तीच्या पंचनाम्यामध्ये आम्ही सोबत लॅपटॉप घेवुन गेलेबाबतचा स्पष्ट उल्लेख नाही. साक्षीदार पुढे सांगतो की, आवश्यक ती साधनसामुग्री घेवुन गेल्याचे त्यात नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर निशाणी क्रमांक २९ कडे मोबाईल जप्तीच्या पंचनाम्यामध्ये पंचांच्या स्वाक्षरी खाली त्यांची नावे नमुद नाहीत.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, सदर इसम प्रेम प्रमोद डुकरे याने त्याच्या नावचे सिमकार्ड चोरीला गेलेबाबत कोणत्याही पोलीस ठाण्यात तक्रार केली होती अगर, कसे याचा उल्लेख सदर पंचनाम्यात करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पो.हे.कॉ. विवेक रसाळ यांनी केलेल्या व्हीडीओग्राफी व फोटोग्राफीची प्रत आरोपीला देण्यासाठी दोषारोपपत्रासोबत जोडण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मोबाईल सिमकार्डसह प्रस्तुत आरोपीच्या ताब्यातुन मिळुन आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रमांक २९ कडे पंचनाम्यामध्ये नमुद असलेल्या दोन आयईएमआय पैकी केवळ एकच क्रमांक फिर्यादीत नमुद करण्यात आला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे, सदरचा जप्त मुद्देमाल हा फिर्यादीच्या दुकानातुन चोरीला गेलेला मुद्देमाल नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची वैद्यकीय तपासणी केलेबाबतचे प्रमाणपत्र हस्तगत करुन ते मी याकामी जोडलेले नाही. साक्षीदार पुढे सांगतो की, त्याच पत्रावर त्यांचा शेरा असतो, प्रमाणपत्र देण्यात येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा पंचनामा पोलीस ठाण्यात बसुन तयार केला असुन तो बनावट व खोटा आहे.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, वस्तु – ड कडील मोबाईल सारखा मोबाईल बाजारात सहतजरित्या उपलब्ध होवु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस ठाण्यात बसुन दोन्ही पंचांच्या कोऱ्या कागदावर सहया घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही प्रस्तुतकामी पोलीस ठाण्यातुन रवाना झाल्याबाबतची ठाणे दैनंदिनीची नोंद याकामी हजर केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात मी कथन केलेले सर्व दस्तऐवज खोटे व बनावट आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला ताब्यात घेतलेबाबतची कोणतीही कागदपत्रे मी याकामी हजर केली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.05.08 18:03:54 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक ०८/०५/२०२६
न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,
स्थळः देवरुख
जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 08/05/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 08/05/2026 |
| Evidence uploaded on | :- | 08/05/2026 |